Nov - Dec 2022

ISSN-2277- 8721

# EIIRJ

## ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

VOLUME-XI, SPECIAL ISSUE- I

SJIF IMPACT FACTOR: 8.095

**PEER REVIEWED REFEREED JOURNAL**



Chief Editor : Dr.Sangeeta Pande

Sub Editor : Mr.Mandar Thakur

Mr. Laxmikant Satpute

Dr.Sunildatta Gavare

ISSN-2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# Index


| | | Author Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | बहुसांस्कृतिक वाद | डॉ. हरिश नवले | 1 |
| 2 | षोडश-निदान-संशोधन-मार्गदर्शन | डॉ. शर्मिला वीरकर | 8 |
| 3 | धर्मनिरपेक्ष बहुसांस्कृतिकता अन्वयार्थ व आशयसह | डॉ. अमन बगाडे | 15 |
| 4 | सॅम्युअल हंटिग्टन यांना अनुसरून बहुसांस्कृतिक संघर्षाचा अन्वयार्थ व सहिष्णूतेचे महत्त्व | डॉ. रेखा मारोतराव शेरकर | 21 |
| 5 | समकालीन पूर्व समाजातील बहुसांस्कृतिकता | डॉ. सुनीलदत्त एस.गवरे | 25 |
| 6 | भारतातील बहुसांस्कृतिकता : वर्तमान स्थिती आणि समकालीन आव्हाने | डॉ.मनोज उत्तमराव पाटील | 31 |
| 7 | Role of A Philosopher in The Modern World | *Ms.Varsha Vipul Gala* | 37 |
| 8 | Multiculturalism: Need of The Hour | *Mr.Shaikh Zeeshan* | 39 |
| 9 | नवीन शैक्षणिक धोरण : मूल्यशिक्षण व तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता | डॉ. शुभदा जोशी | 43 |
| 10 | नवीन शैक्षणिक धोरण २०२० – मूल्यशिक्षण आणि तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता | डॉ. प्रिया मंगेश वैद्य | 50 |
| 11 | स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षातील शैक्षणिक परिवर्तन राष्ट्रीय शैक्षणिक २०२० : एक समावेशक धोरण | डॉ. किरण सावे | 62 |
| 12 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (NEP) तत्वज्ञान व तर्कशास्त्रातील विविध अभ्यासपद्धतींची प्रस्तुतता | डॉ. सुनील ब. भोईटे | 71 |
| 13 | नवीन शैक्षणिक धोरण- 2020 : मानवी कल्याण आणि मूल्यविचार | डॉ. संगीता पांडे | 78 |
| 14 | नवीन शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षण | डॉ. सचिन खोकले | 84 |
| 15 | संस्कृतीचे जतन , संवर्धन आणि संक्रमण करण्यासाठी धार्मिक - अध्यात्मिक आणि तात्विक बाबींचा शिक्षणातील सहभाग | प्रा. मनोज किसन जाधव | 87 |
| 16 | नवीन शैक्षणिक धोरणाचे मूल्यमापन | प्रा.प्रियंका प्रल्हाद उंबरे | 93 |

ISSN-2277-8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article


| | | | |
|---|---|---|---|
| 17 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मूल्यशिक्षण | डॉ. धनराज हाडुळे | 100 |
| 18 | Education for Peace - A Dire Necessity | *Dr. Amita Valmiki* | 110 |
| 19 | Origin and Development of the Values and Ethics | *Prof. Pradnya Pandit* | 115 |
| 20 | Implementation of Pilgrimage Approach New Education Policy in the Vision of Sree Narayan Guru | *Ms.Beena Jaiprakash More* | 122 |
| 21 | New Education Policy 2020: Foundation Of A Nation Based On Ethics And Human Values | *Dr. Kokila Kalekar* | 127 |
| 22 | नवीन शैक्षणिक धोरण व आव्हाने | सौ. निकिता पंकज तरे | 132 |
| 23 | स्त्रीवाद: एक समाजाधिष्ठित तात्विक विवेचन | डॉ. रीना अविनाश पितळे पुराडकर | 138 |
| 24 | परिवर्तनशील समाजासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांची स्त्रीवादी विचारधारा | डॉ. रोहित गायकवाड | 144 |
| 25 | स्त्री संत: भक्ती आणि स्त्रीमुक्ती | प्रा.कीर्ती नारायणराव मार्डीकर | 150 |
| 26 | हिंदू कोड बिल आणी भारतीय महिला | डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र | 154 |
| 27 | बसव दर्शनातील स्त्री विषयक विचार | डॉ. उद्धव नरहरी कांबळे | 159 |
| 28 | संत जनाबाई : स्त्री शक्तीचा अविष्कार | प्रा.सोनाली सुरेश पेकम | 164 |
| 29 | तंत्रज्ञान हे शिक्षकाला पर्याय नसून शिक्षकाच्या प्रगतीस सहाय्यक | प्रा.वर्षा नितीन जपे | 168 |
| 30 | भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान | डॉ. बाळासाहेब संपतराव मुळीक | 172 |
| 31 | वैदिक कालखंडातील स्त्री जीवनविषयक विचार | सौ.गौरी हेमकांत गायकवाड | 178 |
| 32 | The Status of Women in the Three Eras – With Special Reference to Jyotirao & Savitribai Phule | *Ms.Swadha Dinesh Nathalkar* | 182 |
| 33 | स्त्री भारतीय समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान : काल आज आणि उद्या | कु. समीना दस्तगीर अत्तार | 185 |
| 34 | स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष आणि लोकशाही पुढची आव्हाने | डॉ .माधव नरहरी कांबळे | 191 |

ISSN-2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# परिवर्तनशील समाजासाठी फुले, शाहू, आंबेडकर यांची स्त्रीवादी विचारधारा

* डॉ. रोहित गायकवाड ,

*तत्वज्ञान विभाग, सोनोपंत दांडेकर पालघर महाविद्यालय

**सारांश :**

परिवर्तन हा निसर्गाचा नियम असला तरी भारतीय नियमाने स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वालाच कुलूप बंद केले होते. त्यामुळे त्यांच्यावर नैसर्गिक अन्याय झाला होता, त्यासाठी वेगवेगळ्या कालखंडात प्रयत्न केले गेले. त्यासाठी राजाराममोहन राय, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या धुरीनांना प्रचंड संघर्ष करावा लागला किंबहुना या प्रत्येकाच्या चळवळीचे तेच खरे धोरण होते. फुले शाहू आंबेडकर या तीनही मानवी अधिकारांचे प्रणेते असणाऱ्या या महापुरुषांनी स्त्री राष्ट्रीय नष्ट करून तिला स्वतंत्र अस्तित्व देण्याचे धोरण ठरविले त्या दृष्टीने विचार प्रस्तुत केले व उभव्य दिव्य कार्य केले

**किवर्ड :** महिला अधिकार, डॉ बाबासाहेब आंबेडकर, राजाराम मोहन राय, महात्मा फुले

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

**प्रस्तावना:**

भारतीय समाजरचनेमध्ये वंचित समाज घटकांमध्ये स्त्रिया शुद्रातिशूद्र, अस्पृश्य, दुर्बल, सवर्ण, गरीब, आदिवासी यांचा समावेश होतो त्यातील भारतीय समाजात प्राचीन काळापासून स्त्रियांना दास्यामध्ये ढकलून देण्यात आले आहे. प्राचीन वैदिक धर्माच्या कठोर नियमामुळे भारतीय स्त्रियांचे जीवन अधिकच खडतर झाले, त्याचा परिणाम भारतीय समाजाच्या मानवी अधोगतीकडे झाला. स्त्रियांना कठोर सामाजिक नियमामुळे त्यांच्या सर्वांगीण उन्नयचा मार्ग बंद झाला. मानवनिर्मित पौरूषेय सामाजिक नियमनामुळे रूढी, परंपरा व व्रत वैकल्य या चक्रव्यूहात तिला गुंतवून तिची विवेकशीलता हीरावून घेतली गेली. तिला शारीरिक, मानसिक व धार्मिक दृष्ट्याही दुर्बल बनवण्याचा प्राचीन काळापासूनच यशस्वी प्रयत्न झाला त्यामुळे आजही लोकसत्ताकातही स्त्रियांच्या अधिकारासाठी चळवळी उभाराव्या लागतात किंबहुना त्या अधिक गतिमान करण्याची गरज भासते. स्त्रियांचे अस्तित्व व मानवी अधिकारासाठी स्त्री वर्गांनी उभारली नाहीत, मात्र पुरुषी नेतृत्वाने स्त्रियांचे दैन्य त्याची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी खऱ्या अर्थाने आपआपल्या पद्धतीने संघर्ष उभा केला व जाणीवा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. भारतीय स्त्रियांना चोहोबाजूंनी मानसिक दृष्ट्या विकलांग केलेले असताना व त्या प्रक्रियेत अद्यापही सातत्य असताना त्या शक्तींना रोखण्यासाठीचे अनेक व्यक्तींचे प्रयत्न व्यक्तिगित स्वरूपाचे होते. तरी देखील काही मानवानुभवांच्या स्त्रीवादी भूमिका व कार्यामुळे त्याला सर्वांगीण रुप येऊन मोठ्या प्रमाणात याबाबत समाज विचार करू लागला. बऱ्याच प्रमाणात याबाबत व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर दृश्य परिणाम बघायला मिळू लागले. हजारो वर्षापासूनचे मानसिक व शारीरिक, विवेकी दुर्बलत्व एकाएकी नष्ट होणारे नव्हते त्यासाठी रचनात्मक प्रामाणिक त्यागी व कष्टप्रद प्रयत्नाची गरज होती त्यासाठी

ISSN-2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume-XI, Special Issue- I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

पुरुष नेतृत्वानेच पुढाकार घेऊन या दृष्टीने वैयक्तिक चळवळील उभारल्या. या लढ्यासाठी स्त्रियांपेक्षा पुरुषवर्गाचेच अधिक सहकार्य मिळाले, त्याचा परिणाम असा झाला की, अनेक प्रकारचे अनेक स्तरावर सामाजिक बदल दिसायला सुरुवात झाली.

परिवर्तन हा निसर्गाचा नियम असला तरी भारतीय नियमाने स्त्रियांना त्यांच्या अस्तित्वालाच कुलूप बंद केले होते. त्यामुळे त्यांच्यावर नैसर्गिक अन्याय झाला होता, त्यासाठी वेगवेगळ्या कालखंडात प्रयत्न केले गेले. अनेक संत महात्म्यांनी कधी देव, दानव कधी स्वर्गनरक याची भीती दाखवून स्त्रीवर्गाप्रती सहानुभूती दाखवण्यासाठी समाजाला जागरूक करण्यासाठी प्रयत्न केले ते प्रयत्न भूतदयावादी असल्याकारणाने खऱ्या अर्थाने यशस्वी होऊ शकले नाहीत मात्र भारतीय स्वतंत्र्याचा लढा तसेच भारतात स्त्री वर्गाच्या शिक्षणाची सुरुवात झाल्यानंतर महिला वर्गाच्या हिताच्या दृष्टीने अनेक समाजधुरीणांनी महत्व देऊन हि चळवळ अधिक गतिमान केली जेंव्हा स्त्रियाच सती प्रथेचे समर्थक असतात व अशा स्त्रियांची संख्या अगणित असते अशावेळी सामाजिक परिवर्तन घडविणे हे एक आव्हान असते. स्त्रियांवर अन्याय होत असताना त्यांनाच त्याची जाणीव नाही किंबहुना तो अन्याय नसून ती ईश्वरी कृती किंवा आज्ञा आहे आणि आपण ती पाळलीच पाहिजे अशी दृष्ट मानसिकता असलेल्या बलाढ्य स्त्रीवर्गाला परिवर्तित करणे हे खूप मोठे सामाजिक आव्हान होते, पण तरीही कधी कायद्याचा धाक दाखवून, कधी कायद्याची मदत घेऊन, कधी पुरुष वर्गाला स्त्री वर्गाला जागृत करून राज्यकर्त्यांची मदत घेऊन हे काम काही समाज पुरुषांनी पुढे नेले त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, राजाराम मोहन राय, छत्रपती शाहूजी महाराज, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे हे अग्रणी आहेत.

**दुय्यमत्व व शोषण:**

भारतीय स्त्रियांना सामाजिक संरचनेत अत्यंत दुय्यम स्थान होते व आजही आहे. ती निसर्गाचा एक महत्त्वपूर्ण अविभाज्य घटक असूनही तिला दैवीय आज्ञाद्वारे दुय्यम ठरविणारी पुरुष लिखित शास्त्र्ये सुद्धा कारणीभूत आहेत. एका मोठ्या समूहाला मात्र दुय्यम समजल्यामुळे त्यांचे प्राथमिक स्वरूपाचे मूलभूत हक्क नाकारले गेले ते कायमचे त्यासाठी अनेक समाज सुधारकांना शर्तीचे अगदी त्याच्या जीवावर बेतण्याइतपत प्रयत्न करावे लागले. शास्त्रानीच व देवानेच आज्ञेद्वारे आपल्याला या स्थितीत ठेवले आहे त्यामुळे देवाज्ञा मानून आपण ते सहन केले पाहिजे. कितीही शारीरिक, मानसिक शोषण केले तरी तेच आमचे कर्तव्य समजून स्त्रीवर्गाने मोठे बंड उभारले नाही त्यासाठी व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न झाले आहेत, मात्र त्यांना सर्वांगीण सर्वंकष चळवळीचे रूप येऊ शकले नाही त्यामुळे वैयक्तिक, सामुदायिक व सामाजिक पातळीवर प्रतिकार करण्यासाठी चळवळ उभारणे जरुरीचे होते, त्यासाठी राजाराममोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या धुरीनांना प्रचंड संघर्ष करावा लागला किंबहुना या प्रत्येकाच्या चळवळीचे तेच खरे धोरण होते.

**ब्रिटिश सत्तेतील परिवर्तनाची दशा व दिशा:**

राजा राम मोहन रॉय यांनी सतीबंदी कायदा आणण्यासाठी केलेले प्रयत्न व त्यामुळे स्त्रियांच्या प्रश्नाकडे स्वातंत्र्यलढ्यातही चळवळीचे अग्रणीचे लक्ष गेले स्त्रियांच्या समस्या, त्यांचे दास्य, त्यांचे दुय्यमत्व केंद्रस्थानी आले. राजाराममोहन रॉय यांनी स्त्री पुरुष विषमतेला

ISSN-2277- 8721
EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal
Volume–XI, Special Issue– I
Nov – Dec 2022
OPEN ACCESS
Original Research Article

जातीभेद व वर्णभेद पेक्षा ही भयंकर मानले. वर्ण व्यवस्थेतील उच्चभ्रू समाजाच्या स्त्रिया व शूद्रातिशुद्र समाजातील स्त्रिया या दोन्ही शोषित आहेत. त्या दुय्यम आहेतच पण पीडित आहेत, अत्याचारित आहेत त्यांच्यावरील अन्यायाचे परिणाम हे वेगवेगळे होते मात्र हा पूर्ण वर्ग मात्र दास्याचेच जीवन जगत होता कौटुंबिक, वैयक्तिक व सामाजिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आल्यामुळे व्यक्तिगत किंवा सामाजिक उन्नयनाची सुतराम शक्यता नव्हती उन्नयना पेक्षाही मूलभूत समानता मिळणे ही अत्यंत महत्त्वाची बाब होती. सामाजिक समानता मान्य झाली तर स्त्री-पुरुष विषमतेचा दृष्टिकोन कमी होतो त्यामुळे राजा राम मोहन रॉय शूद्रातीशुद्रांच्या स्त्रियांच्या प्रश्नापेक्षाही अभिजन्य वर्गातील स्त्रियांच्या प्रश्नाकडे लक्ष देऊ लागले.

**महाराष्ट्रातील स्त्री सुधारणा:**

महाराष्ट्रात स्त्रियांच्या सुधारणांच्या दृष्टीने सर्वंकष दृष्टीवेग बाळगण्यात आला नाही किंबहुना महात्मा फुले यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन व रानडे आगरकर प्रणित स्त्रीविषयक दृष्टिकोन यामध्ये कमालीची तफावत आहे. रानडे, आगरकर हे जॉन स्टुअर्ड मिलच्या सुधारणावादामुळे अत्यंत प्रभावी झाले व त्यांनी स्त्रीमुक्तीचा विचार मांडला मात्र तो केवळ ब्राह्मण स्त्रियांकरता मर्यादित होता. त्याला कारणही तसेच होते. उच्चभ्रू समाजातील विशेषत: ब्राह्मण वर्गातील स्त्रियांचे दास्य व शूद्रातिशूद्र वर्गातील स्त्रियांचे हे वेगळ्या स्वरूपाचे होते. त्याची तीव्रता व परिणामकारकता वेगळ्या स्वरूपाची होती. अभीजन्य वर्गातील स्त्रिया अजूनही त्यांचे प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचे होते.

बालविवाह, सती प्रथा, केशवपण, जठर विवाह, हुंडा प्रथा त्यातून निर्माण होणारे बाल वैधव्य, नीराश्रीतता या भयंकर सामाजिक प्रश्नांना उच्चभ्रू स्त्रिया सामोरे जात होत्या त्यामुळे त्यांच्या दास्याबद्दल त्यांच्या मुक्ती विषयीची चळवळ आगरकर रानडे यांच्या वैचारिकतेची दिशा बनली दुसऱ्या बाजूला शेतकरी व शूद्रतीशूद्र वर्गातील स्त्रियांचे दास्य हे वेगळ्या प्रकारचे होते. त्यांच्या वाट्याला सामाजिक कुंठितता आली होती, त्याशिवाय आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, दुर्बलता व गुलामगिरी लादल्या गेली होती. ब्राह्मण स्त्रियांना जगण्याची भ्रांत नव्हती मात्र शूद्र स्त्रियांना जगण्याची हमी नव्हती. रानडे, आगरकरांना ब्राह्मण वर्गातील गुलामगिरीचे प्रश्न गंभीर वाटले मात्र महात्मा ज्योतिबा फुले यांनी या अभिजन्य वर्गाला जबाबदार धरले सर्व स्त्रिया या पुरुषी सत्तेच्या अहंकाराच्या आणि वर्ग सत्तेच्या बळी ठरल्या आहेत आणि त्यामुळे त्यांनी आर्थिक सत्ता, धार्मिक सत्ता, सांस्कृतिक सत्ता, याला विरोधकेला.

**सावित्रीबाई फुले महात्मा ज्योतिबा फुले स्त्री स्वातंत्र्याचा एल्गार:**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान हे स्त्री पुरुष समानतेवर आधारित आहे. सार्वजनिक सत्य धर्माची स्थापना करून तसुभरही अधिकचे स्वातंत्र्य किंवा श्रेष्ठत्व त्यांनी पुरुषवर्गाला बहाल केले नाही. त्यांनी उतरंड ही विषमता निर्माण करते. व श्रेष्ठत्व ही सामाजिक अराजक निर्माण करते. असेच म्हटले आहे. महात्मा फुले दांपत्ये हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील स्त्री वर्गाच्या खऱ्या अर्थाने उन्नयाचे महामेरू ठरले आहेत. स्त्रियांची मूलभूत हक्क, त्यांचे सामाजिक, कौटुंबिक, वैयक्तिक स्थान हे अबाधित राहिलेच पाहिजे आणि स्त्री पुरुष समानतेसाठी कोणत्याही प्रकारची तोडजोड करू नये हा दृष्टिकोन त्यांनी बाळगला व त्या दृष्टीने रचनात्मक कार्य केले.

ISSN-2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

सत्यशोधक पद्धतीने विवाह करताना घ्यावयाच्या शपथा बघितल्या तर त्याद्वारे जणू स्त्री पुरुष समानतेचा जागरच त्यांनी सुरू केला आहे. त्यांनी स्त्रियांच्या विकासासाठी स्त्री पुरुष समानतेसाठी प्रचलित समाज व्यवस्थेविरुद्ध लढूनी निकराचा लढा उभारला वैयक्तिक लढा बरोबरच सामाजिक चळवळ उभारली त्यांनी पंडिता रमाबाई ताराबाई शिंदे या महिला समाजसुधारकांना जाहीर पाठबळ देऊन स्त्रीमुक्तीची चळवळ अधिक गतिमान केली.

जिथे सामाजिक विषमता आहे जिथे स्त्री पुरुष भेद आहे अशा सर्वच बाबीवर त्यांनी कृतीद्वारे प्रहार केला. एका बाजूला ब्राह्मण स्त्रियांना, विधवांना आधार आणि दुसऱ्या बाजूला शूद्रातिशूद्र मुलींना विद्यादान दोन्ही क्षेत्र त्यांनी कार्यप्रवण ठेवली व सामाजिक बदलांना प्रारंभ केला.

**राजश्री शाहू महाराज स्त्रि दास्य उच्चाटनाला कायदेशीर आधार:**

महात्मा ज्योतिबा फुले यांचा सत्यशोधकी विचार व तत्वज्ञान राजश्री छत्रपती शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने समाजात रुजविले. एका विशिष्ट वर्गाचे वर्ण श्रेष्ठत्व नष्ट करून सामाजिक उद्बोधन व कायद्याद्वारे स्थापित समान समाज रचनेसाठी ते विविध मार्ग अवलंबू लागले. केवळ शूद्रातिशूद्रच नव्हे तर स्त्री वर्गाला गुलामीच्या व अज्ञानं अंधकार व अंधश्रद्धेच्या बाहेर काढण्यासाठी शाहू महाराजांनी दोन पातळीवर कार्य केले स्त्रियांना खऱ्या अर्थाने सामाजिक अस्तित्व मिळाले स्वातंत्र्य मिळावे यासाठी स्त्रिया शिक्षित होण्यासाठी शाळा व वस्तीगृहे सुरू केली व दुसऱ्या बाजूला त्यांना त्यांचे कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी विविध कायदे केले स्त्रियांना समान दर्जा मिळालाच पाहिजे हा मतप्रवाह फुल्यांपासून आला होता व तो अखंडित प्रवाहित होण्यासाठी शाळा व शिक्षण क्षेत्रावर होणारा खर्च त्यांनी मोठ्या प्रमाणावर वाढविला शाळांची संख्या वाढविली वस्तीग्रह वाढविली यासोबतच आणि शिष्यवृत्ती व मुलींसाठी बक्षीसे सुरू केली शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक विषमता नष्ट व्हावी वेगवेगळ्या जाती धर्माच्या स्त्रियांमध्ये ही भेद मूलत भावना राहू नये यासाठी त्यांनी आपल्या विधवा सुने सोबतच इतर जातींच्या मुली ठेवल्यावर अशा व्यतीने जातिभेद विषमता मिटविण्याचा प्रयत्न केला स्त्रियांना संपूर्ण स्वातंत्र्य देण्यासाठी तिला बंधमुक्त करण्यासाठी शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी केलेले चार कायदे स्त्रियांच्या सामाजिक उत्थाना मधील अत्यंत महत्त्वाचे टप्पे ठरले आहेत 1917 चा विधवा पुनर्विवाह कायदा 1919 चा आंतरजातीय आंतरधर्मीय कायदा जोगिणींनी मुक्त कायदा 1920 असे अनेक कायदे व त्याचे कार्य स्त्रियांच्या सर्वांगीण सामाजिक धार्मिक आर्थिक सांस्कृतिक व राजकीय विकासासाठी खूपच प्रभावी ठरले आहे.

**डॉ. आंबेडकर स्त्रीमुक्तीचा जाहीरनामा व संविधानिक अधिष्ठान:**

महात्मा ज्योतिबा फुले छत्रपती शाहूजी महाराज यांनी चालवलेली सत्यशोधक चळवळ यांचे विचार व कार्य महात्मा फुले यांची एक एक विचार प्रणालीला मूर्त स्वरूप देण्याचे कार्य डॉक्टर आंबेडकरांनी आपल्या विचार व कृतीद्वारे दाखवून दिले आहे भारतीय समाज हा रुढीप्रिय आहे पारंपारिक विचार प्रणालीला जखडलेला आहे त्यामुळे त्यातून त्याला बाहेर काढणे अवघड आहे त्यासाठी हे जोकर तोडण्यासाठी कायदेशीर संविधानिक मार्ग अधिक प्रभावी ठरू शकतो यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांचे अधिकार

ISSN-2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume-XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

घटनेत अंतर्भूत करून कायदेशीर ठरविले आहेत.

संविधानातील मूलभूत हक्क हे प्रत्येक प्रकारच्या बिन मूलक विचार व कृतीला विरोध करतात. जात धर्म लिंग रंग वंशावर्ण किंवा प्रादेशिक विभिन्नता या कोणत्याही भेद मूलक बाबींना संविधानाने स्पष्टपणे नाकारले आहे त्याशिवाय कायद्याचे राज्य स्थापित करून कायद्यासमोर सर्वजण समान हे तत्व चिरंतन ठरविल्यामुळे कोणत्याच प्रकारच्या भेद मूलकृती विचार व्हा व्यवहाराला कायदेशीर अधिष्ठान व आधार राहिलेला नाही बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांच्या विचार व तत्वज्ञानातील स्त्री पुरुष समानतेचे समग्र तत्वज्ञान संविधानिक केले आहे त्यामुळे स्त्रियांच्या सर्वांगीण अधिकार व सामाजिक विकासाला प्रचंड घटती मिळाली आहे युरोपियन स्त्रियांना ही भारतीय महिलांच्या उशिराने मतदानाचा हक्क मिळाला आहे हिंदू गोडबिल म्हणजे स्त्री पुरुष समानतेचा जाहीरनामा त्या विधेयकातील अनेक तरतुदी आज कायदेशीर होत आहेत त्यामुळे स्त्री पुरुष विषमतेला कायद्याच्या राज्य संकल्पनेत किंवा व्यवहारात स्थान राहिलेले नाही स्त्रियांची नैसर्गिक मूलभूत स्वरूपाचे संपूर्ण अधिकार संविधानाने बहाल केले आहेत बदललेल्या काळाच्या ओव्या स्त्रियांच्या समस्येचे स्वरूप ही बदलत असले तरी श्री वर्गाच्या सर्व कश उन्नतीसाठी भारतीय संविधान व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेल्या सामाजिक चळवळी स्त्रियांसाठी एक प्रशस्त व अस्वस्थ मार्ग ठरल्या आहेत.

**निष्कर्ष:**

हजारो वर्षांच्या सामाजिक बंधनामुळे व शास्त्रीय धर्मशास्त्राच्या विषमता मूलक नियमामुळे भारतीय स्त्रियांनादाचे पत करावे लागले कालोद्यात तशाच प्रकारचे अनेक समाज रचना बनत गेली श्री विकासाला स्वातंत्र्यला तिच्या अस्तित्वाला मारक रूढी परंपरामुळे तिची स्वातंत्र्य नष्ट झाले विवेक संपला व आपली अवस्था ही देवीस आहे. ही मानसिकता स्त्री वर्गाचीबनविली गेल्यामुळे त्रिमूर्ती साठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागला स्वातंत्र्यलढा चालू असताना व देशात शिक्षणाचे सर्वत्रिकीकरण वेगाने होत असताना स्त्रियांच्या गुलामगिरी त्यांचे अस्तित्व त्यांचे स्वातंत्र्य हे प्रश्न केंद्रस्थानी आले फुले शाहू आंबेडकर या तीनही मानवी अधिकारांचे प्रणेते असणाऱ्या या महापुरुषांनी स्त्री राष्ट्रीय नष्ट करून तिला स्वतंत्र अस्तित्व देण्याचे धोरण ठरविले त्या दृष्टीने विचार प्रस्तुत केले व उभव्य दिव्य कार्य केले महात्मा फुले यांच्या स्त्री पुरुष समतावादी दृष्टिकोन छत्रपती शाहूजी महाराजांनी हा विचार पुढे नेऊन शिक्षणाच्या व कायद्याच्या आधारे केलेले कार्य व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची स्त्री पुरुष समानतेची कार्य महिला वर्गाच्या विकासात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहे महिला वर्गाचे अस्तित्व स्वायत्ते त्यांचे अधिकार संविधान सभेला गेल्यामुळे त्यांचे विकासाला प्रचंड गती आली आहे

श्री केंद्र काढल्यामुळे पुरुषांच्या मानसिकतेत व व्यवहारात मुलाग्रह बदल घडवून आला आहे.

**संदर्भ:**

- विचार वेद संकलन बानगुडे सुगावा प्रकाशन पुणे ISBN 978-81-906648-0-6
- धनंजय कीर राजर्षी शाहू छत्रपती पॉप्युलर प्रकाशन ISBN 978-81-7185-809-5
- रावसाहेब कसबे डॉक्टर आंबेडकर आणि राज्यघटना सुगावा प्रकाशन पुणे